1140

1140
COḶKAR (Gopāḷ Kṛṣṇa)
Raṇagarjanā. Povāḍā bhāga 1 lā va 2 rā.
Akolā (Bombay printed): G.K. Coḷakara, [1930?].
24 p. 18 cm.
Nationalistic ballads (part 1 only is 3rd ed.) on the salt-tax question, in praise of Gandhi, etc.
PP Mar B 24

NATIONAL ARCHIVES

॥ श्रीदत्त प्रसन्न ॥

रणांगणी

पोवाडा भाग १ ला व २ रा.

लेखक व प्रकाशक—

शाहीर गोपाळकृष्ण चोळकर,

आकोला [वऱ्हाड]

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

भाग १ ला. आवृत्ती ३ री. ५०००

किंमत २ आणे.

भाग २ रा. आवृत्ति १ ली. ५०००

NATIONAL ARCHIVES OF INDIA

गांधीच्या टकळीचा प्रताप.

चाल: (मला मुंबईला जायचं)

आर ही गांधीचि टकळी ॥ इंग्लंडच्या बोकांडि बसली ॥ धृ ॥
टकळि आली देशांत । अगदि साध्या वेशांत ॥
पाहुन गोऱ्याचि नजर फाकली ॥ १ ॥ आर०
टकळी चर्क्याचि पोर । मोठि झाली शिरजोर ॥
अन्नु सरकारचि बाजारी विकली ॥ २ ॥
बारिक टकळीचि तार । जशि खड्गाचि धार ॥
इन मँचेस्टरची मान कापली ॥ ३ ॥
टकळी आली घरी । लहानास थोर करी ॥
घर-बसल्या शेती कशि पिकली ॥ ४ ॥
लहान थोर किती ॥ टकळि हाती घेती ॥
वकिलांनींहि वकीली टाकली ॥ ५ ॥
सुत टकळिवर काढी । त्याचीं डोकीं फोडी ।
गोरा कसा हा बनला बेअकली ॥ ६ ॥
विद्या विद्यार्थ्यांचि । खास टकळी साची ॥
होईल मँचेस्टरचा माल नकली ॥ ७ ॥
स्वतंत्रता हवी । त्यान टकळी घ्यावी ॥
परकी सत्ता समजा प्राणास मुकली ॥ ९ ॥
प्रत्येकाचे हातां । जरी टकळी फिरतां ॥
तरी आपली साडेसाति चुकली ॥ १० ॥
टकळि धर्ता करी । सौख्य देईल हरी ॥
शाहिर म्हणे एकी जरि टिकली ॥ ११ ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

॥ श्री ॥

रणगर्जना भाग १ ला.

(चाल—डफाचे पोवाडयाची)

गर्जना १ ली.

प्रारंभि जोडितो कर । तुझा चाकर । मोरया येई शंभु तनया । नेई मम सिद्धिस या कार्या ॥ वाहतो काव्यदेवता । विधीची सुता । देवि सरस्वती साह्य होई । काव्याचा पण सिद्धिस नेई ॥ धनदाट सभा पाहुन । करितो वंदन । बुद्धिमान बंधु भगिनीला । शिशूच्या ऐका कवनाला ॥ चुगलखोर पोलिस रिपोर्टर । भाषा पेन्टर । ऐका तुम्हि उघडया र कानान । रिपोर्ट लिहुन धाडा इमानन ॥ करुनिया बंधुमत्सर । पातकी थोर । खावुन तुम्हि भारताचि पोळी । गोऱ्याचि वाजविता टाळी ॥ शत्रुचे बनला नोकर । जाहला फितुर । इंग्लंड काय बापजादे तुमचे । पुत्र अहा तुम्हि भारताचे ॥ येथेच जन्म पावला । येथे वाढला । मृत्यु आखेर येथे होणार । गोऱ्याला सुतुक काय पडणार ॥ धरा लाज कांहीं रिपोर्टर । आज थोडि फार । वीतभर खळगीसाठी मरता । चरचरा बंधु कंठ चिरता ॥ फौजदार चौधरी सत्य । होता नाशिकांत । त्यान फौज-दारि सोडुन दिधली । गांधिसैन्यांत नांव घाली ॥ सोडली जरी नौकरी फौजदारी । मेलि काय सारी । वायका पोर त्याचि उपासान । झळकला देशभक्त म्हणुन ॥ रिपोर्टर नौकरी सरकारी । सोडा झडकरी । अंधारांत दडला घुवडावाणी । उजेडात यारे मर्द बनुनी ॥ सत्याग्रह रण भडकले । वीर धडकले । अन्याइ र सत्ता झोडण्याला । चला तुम्हीं कायदे मोडण्याला ॥ ध्रु ॥

दुर्दैव हिंदुस्थानाचे । ओढवले साचे । पाहता अपुल्या पूर्वस्थितिला । परक्या सत्तेन कहर केला ॥ ऐश्वर्य भरत भूमिचे । ऐसें पूर्विचे । चांदी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सोन्याची लूट होती । रत्नानि भरले होते हत्ती ॥ चंदनाचे पलंगावर्ति। होते माणिक मोती । दौलतिचा लगत नव्हता पार । परी तें झाल स्वप्न सार ॥ पुर्वि बरकत होती अपरंपार । रत्नालंकार । सोन्याचा धूर पूर्वी होता । गिरणी कोळशाचा धूर आतां ॥ कस्तुरिन पुर्वि स्त्रिया न्हाती । मिळत नाहिं ती । कस्तुरिच समजुन काळि माती ॥ घेवुन अता स्त्रिया किती न्हाती ॥ शापादपी शरादपि साचे । ब्राम्हण पुर्विचे । अताचे ब्राम्हण धर्म भ्रष्ट । जोडे ही विकुन भर्ति पोट ॥ क्षत्रीय पूर्विचे शूर । राजे बहादर ॥ अता क्षत्रियांनि शस्त्र सोडूल । तलवार टाकुन रुमूल हाती धर्ले ॥ धर्माचि झाडि सारि माती । कसले माणिक मोती । चांदि सोन्याचि भांडि गेली । अता टिन पाटे फक्त उरली ॥ नेऊन होन, पुतळि, मोहोर, गिनी काढली एक आणी । रुपया ऐवजी देतो नोट । बुडतसे टार जळता कोट ॥ कुठे गेले इंद्र ऐश्वर्य । झाल आश्चर्य । पांढ्या पायान दौलत नेली । नरोटी आपल्या हाति देवली । हरघडी टॅक्स वैसवी । देश नागवी । अन्याइ र वायदा वाढविला । पिळुनशान काढल शेतकऱ्याला ॥ पाण्या पावसांत उन्हां-मदि खपुन । कष्ट आम्हीं करून । केले जरिकाहि इस्टेटीस । द्या म्हणे कर इनकमटॅक्स ॥ नझुल खाल्याचि जागा वाढली । पायरी पाडिली । मोरिचि र जागा नाहि सोडली । टॅक्सापाई दीन प्रजा नाडली ॥ तुम्हीं समजा त्याचा उपकार । रती सुखावर । अजुन कांहिं टॅक्स न बसविला । गोरा काय पिशाच्य अवतरला ॥ याचे परिस बरी मोंगलाई । झाली निजामशाही । शूर तो विरवल शहा अकबर । होवुन गेले मर्द मर्दांकबर ॥ हुमायून मर्द जहांगीर । महंमद बाबर । मर्द तो औरंगजेब शहाजान । महंमद घोरि लोदि सुलतान ॥ पृथ्विराज चव्हाण बहादर । राठोडीवीर । शिवाजी छत्रपती शूर । मांगु किती राजे मर्द थोर ॥ प्रजे

NATIONAL ARCHIVES OF INDIA

हाति ठेवुन शस्त्रास । करिति राज्यास । मर्द ते राजे इतिहासीं । पहा नामर्द इंग्रजासी ॥ शिपायांच्या हांति शस्त्र मोठे । दंडुके छोटे । त्यांचा ही विश्वास नाहि ज्याला ॥ शस्त्र कुठुन ठेविल तुम्हाला ॥ नशिब समजा तुमच ले थोर । विळे कोयत्यावर । अजुन यान लाय-सन्स नाहिं काढल । कारण एक खात अस्त वाढल ॥ नच शस्त्र ठेविलें करी । केले भिकारी । मारिलें मर्द भावनेला । देवुन आंग्रजी शिक्षणाला ॥ निज धर्मवृत्ति लोपली । इंग्रजी शिरली । पँट बुट हॅट नेक्टा लावला । जणुं साहेबाचा बाप बनला ॥ बाप जिता असुन प्रत्यक्ष । देईना लक्ष । बोडुनी मिशा चष्मा घाली । २० वर्षांत ४० शी आली ॥ इंग्राजिन वृत्ति केसि पिशी । बनला आळशी । शक्ति नाहीं उर्लि र तंगडयात । चालवेना पाई एक शेत ॥ इंग्रजी शिक्षण घेतले । मॅट्रिक शिकलेले । ग्रॅजुएट झाले हिंद पुत्र । परी वाचता येईना मोडि पत्र ॥ इंग्रजी मोठा शिकलेला । उजळणि नये त्याला । १८ साते सांग किती होतात । गुणाकारांत दंग होतात । कळत नाहिं भाजिचे वजन । इतके विद्वान । नौकरी कशी मिळणार बाजारात । खतावणी कोंद नाहि येत ॥ डिग्री घेवुन बसला हा घरी । नाहि नौकरी । बाप म्हणे जारे शेति वाही । वखर हाकलायची अक्कल नाही ॥ मेहेरबानि करिल गव्हर्मेंट । तरिच भरे पोट । केल शिक्षणानि गुलाम यांना । अजुन कस तुमच्या ध्यानि येईना ॥ अहो कसे विकले अकलेला । आग देशाला । लागली शिकत काय बसना । शिकुन काय गुलाम अखेर बनता ॥ म्हणुन आज हायस्कुलातील । कॉलेजातील । विद्यार्थ्यांनि शाळा । र सोडावी । स्वतंत्रता आधी मिळवावी । तिनलाख गोरा गिणातिला तेहतिस कोटिला । चेंदितो र लाजिवल तुम्हि पशुला । म्हणविता र

माणुस आपणाला ॥ सर्दापरी कुती कांहिं करा । देश उद्धरा । तीसऱ्याच चोरान ठार केले । अपसामंदि तुम्हि भांडन बसले ॥ अपुल्या मंदी दुही माजली । एकि नाहि उरली । म्हणुनशान तिसरा चोर शिरला । तोच शिरजोर होवुन बसला ॥ अहो बाम्हणेतर बाम्हण । हिंदुमुसलमान । एकि नाहि बापा मुलाची की । फार काय नवराबायकोत बेकी ॥ तुम्हि मूर्ख अहाती म्हणुन । बोलतो कर जोडुन । जातिभेद वादावादि सोडा । संमदे एक होवुन शत्रु झोडा ॥

चाल:—उधडिल जान रावणाला । घेऊनशान संग माकडाला ॥

बावळा जो मावळा संग नेला । फितुर चंद्रराव मोरे चिरिला ॥
मूठभर होता संमदा मावळा । परी एकिन विजयी झाला ॥
आजिचा बखुन बंगाळ आला । अन्यायि र कायदा मस्त झाला ॥
मूठमाति देवु त्याला । घेवुनशान हाती ऐक्य भाला ॥

टीप:—अन्यायि कायदा मातला । त्याचे नाशाला । जिवावर उदार गांधि झाला । तुमच्या साठ्याचि गरज त्याला ॥१॥ सत्याग्रहरण:—॥ धृपद ॥

गर्जना २ री.

कायद्याचा शब्द ऐकता । भिउन सरकता । म्हणाविता र मर्द आपणाला ॥ भीत नाहीत बायका मुळी त्याला ॥ कायदा म्हणजे लहर सरकारची । लहर ऑफिसरची । ठराविक अर्थ नाहीं उरला । लहरा ने दुनाइया सर्पाला ॥ कुणि जरी कायदा मोडिला । शिक्षा द्यावि त्याला । जास्तिमधे जास्त सहा महिने । दंड पन्नास द्यावा त्यानें ॥ बोंब ठोकली ऐसि कायद्यात । राहिली नाहीं रीत । शिक्षा झाली नऊ दहा महिन्याची । झाली कुणा वर्ष दो वर्षाची ॥ असला भेद कायद्यामंदि काहीं । कोठे लिवला नाहीं । भेदकरि बेअक्कल जज्ज । चौनिला

तनु विकण्या सज्ज ॥ न्यायासनी न्यायाचा खून । केला त्वा कसुन । लागला कसा गोंडा र घोळायला । सिद्ध झाला बंधूस कापायला ॥ चैनिला विकिले शील । कोठें फेडशील । पाप हे हिंदुसुता बारे ॥ श्राद्ध तुझ नाही करणार गोरे ॥ हे राजसत्ते तू ऐक । असेल दीमाख न्यायाचा । तरि करि न्यायाला ॥ जज्जानी कायदा-भंग केला । आजवर पोकळ गवसल । दोपरान खणल । नोकरशाहिस होति र लै मस्ती । परि आता जिरवु खेळुन कुस्ती ॥ समिंद्राच घेता नुस्त पाणी । बावरे कुत्र्यावाणी । तुरुंगामदि माणुस दडपील । रावणी राज्यास लाजविल ॥ समिंद्राच पाणि निर्माण । केलर देवान । नाहि याच्या बान खणुन काढल । घेता पाणि काय राज्य बुडल ॥ नर्कातील कवडि दातान । घेत उचलुन । असल्या वृत्तीचा थोर कसला । येणार नाही बरकत दौलतीला ॥ मिठावाचुन जगेना प्राणी । ह्मणुन देवानी । पृथ्विहुन निपट समिंदर केला । मिठामुळ शक्तिहि समद्याला ॥ जस मुलीच मिठ तोडिती । तैशी आपुली स्थिती । केली होती नोकरशाहीन । आजवरि जुल्मि कायद्यान ॥ अपुली कमी व्हावया शक्ती । योजिली युक्ती । कावेबाज धूर्त सरकारान । कावा हा ओळखिला गांधीन ॥ गांधिन हुकुम ज्यारि केला । ऐसा जनतेला । ज्याच त्यान मीठ करुन खाव । नाव आपल्या वडलाच राखाव ॥ मी कायदेभंग करणार । स्वराज्य घेणार । शांतिमय सत्याग्रह करुन । मीठचोर नांव कमावीन ॥ महात्मा गांधी यापरी। प्रतिज्ञा करी। दोनशें पन्नास मैल पाई गेला । दांडी गांवी स्वराज्यध्वज रोविला ॥ हक्क तराजुची धरुन दांडी । बसला बोकांडी । असुरि आणि दैवशक्ति मध्यें । पाहु ह्मणे कोण विजयी होते ॥ महिना एप्रिल एकोणविसशेतीस। सहा तारखेस । युद्ध करण्यास सिद्ध झाला । बोलावल त्यान जुल्मी

NATIONAL ARCHIVES OF INDIA

सत्तेला ॥ अन्यायी सत्ता तुडवुन । वीर गांधीनि । स्वहस्ते मीठ तयार केल । भारती स्वराज्य स्थापियेल ॥ जी सत्ता होति माजली ॥ धुळीस घातली । गांधिनर एकाच हप्त्यात । भिति नाही ठेवली भारतात ॥ अठ्ठा पगड जातिचे लोक । संमद एकुण एक । सत्याग्रह करण्यासाठि जमले । स्त्रियांचे संघ कितिक आले ॥ चहुकडे कायदेभंगाच्या । ज्वाळा अग्निच्या । पाहुनशान सरकार घाबरले । लै वेगि जाहिरपत्र काढल ॥ त्यामदि लिवल सरकारान । मायंदाळ मायेन । तुह्मी जे तयार कर्ता मीठ । अपाय करील अशुद्ध हाय मोठ ॥ ज्याला अशुद्ध ह्मणे सरकार । तेच खरोखर । शुद्ध हाय शक्तिमान मोठ । जे का आपोआप होतय मीठ ॥ रणशूर लक्ष्मिबाई फार । झाशिची नार । शुद्ध मिठ खावुन रणी गेली । गोऱ्याला जी कापत सुटली ॥ अशा किती तरी पूर्वजान । रणी जावून । जेर केल होतय इंग्रजाला । त्याचि पुरि आठवण आहे याला ॥

चाल:—ह्मणून हा कावेबाज गोरा । मिठावर ठेवतो सक्त पहारा ॥
काढुन त्यातिल शक्तिमान सारा । आपल्या हाती देतो चोथाभरा ॥
केला त्यान शक्ति ह्रास सारा । भयंकर ठेवलार त्यान सारा ॥
चहुकडुन केला कोंडमारा । युद्धाविण नाहि उरला थारा ॥
टीप:—वरी अथवा युद्ध भुमिवर । मृत्यु येणार । ह्मणून तू गाजवि शौर्याला ॥ भितोस काय तरुणा मरणाला ॥ २ ॥ सत्याग्रह० ॥ ध्रुपद ॥

गर्जना ३ री.

रावणान सिता धरून नेली । तेची गत केली । नेली सारि दौलत इंग्रजतेस ॥ आता संमद कळल भारताला ॥ दौलतिच्या धुंदीत मगरमस्त । देश केले फस्त । स्वर्ग न्याला दोन बोट उर्ला ॥ पाहिला नाही गांधीचा टोला ॥ धुंदी मंदी वस्ता एकदम टोला । कावरा

बावरा झाला । हुकूम त्यान केला नोकराला । पाहतो काय पकडा पुढाऱ्याला । आपलेच बंधु फितूर, निमकहराम । होवुन बेफाम । देशभक्त पुढारी पकडील ॥ दगलबाजीन सौख्य बुडल ॥ देशभक्त, आणि नोकरशाही । दोघात भेद नाही । दोघेही पुत्र भारताचे ॥ भेद हे भक्त भावनेचे ॥ एक तो देश रक्षक । एक भक्षक । एक भूसाठि प्राण देई ॥ एक निजबंधु सुळी घेई ॥ असो पाप ज्याचे तो भरी । सत्याग्रहि वरी । शेकडो पडति, घेवुन बंदुक भाला ॥ जसा याच्या वर्ति डाका पडला ॥ जरी एकटा सत्याग्रही । कितिक शीपाई । अमानुषपणें मार देती । व्हावया जागेची बढती ॥ स्वातंत्र्य प्राप्तीची आस । धरुनि चित्तास । कायदा तोडोनि मीठ करिती ॥ मुंबईत चौपाटिच्या वरती ॥ मिठा भोवती कोंडि बांधिती ॥ सत्याग्रहि ह्मणती । प्राण जरि आमचा आज गेला । देणार नाहि मीठ तुझ्या बाला । शीकस्त कोंडि फोडण्यास । करिं पोलीस लाठ्या काठ्यानी डोकि फोडती ॥ घोड्या स्वारि जनास तुडवीती ॥ फरफरा पोलीस ओढिती । चामड काढिती । अग्निमंदि दकलुनशान देत ॥ पहासे शंकरा किती अंत ॥ गोंडि मोडण्यास करिं गोळीबार । उडाला लै कहर । कितिक जागि माणुस जखमी झाले । क्रूर वृत्तिला बळी पडले ॥ कितिकांचे पाय तुटले । डोळेहि फुटले । परि काहि मीठ न सोडीती ॥ धन्य गांधि सैनिकांची छाती ॥ चाल्वी दंडुकेशाही । क्रूर नौकरशाही । सत्याग्रहि मार खाऊन पडल ॥ परी नाहि मीठ त्यांनि सोडल ॥ इतके करून यश न मिळे जरी । नोकरशाही तरी । गुहेंद्रिय दाबिति जोऱ्यान । गंधमी कृती वर्णवे न ॥ माणुसकिला दिले फासाला । सिमा न हाताला । होवुन बेशुद्ध पडती जेव्हां ॥ मिळे मिठ पोलिसास तेव्हां ॥ ज्या मिठास लागेना दमडी । प्रजेचि काढ़ुनि चमडी । असला राजा उदार

हाचि पहिला । होणार नाहि माग न कुणि झाला ॥ गाडो गणपति अन्याया करुन । पहाड कोरून । उंदिरही नाहि हाति आला ॥ दावल काय सांगा चळवळीला ? । शिव धनुष्यपण लागला । रावण भंगु गेला । परि धनुष्यानच रावण पाडला ॥ भडभडा रक्त ओकु लागला ॥ परकीय राजसत्ते ऐक । पाहिजेका सौख्य । पंथ त्वा भलता धरला साचा । हा तुझ्या यडग्याकडे जायचा । जाते बुद्धि विनाश कालाला । उपाय नाहीं त्याला । दडपशाही शस्त्र सुरू केल ॥ थोर थोर पुढारी दडपील ॥

चाल:—पकडले वल्लभभाईला । राष्ट्रपति जवाहिरलाला ॥

पकडल गांधिच्या पुत्राला । खानदेशांतील दास्यानाला ॥
धरपकड केलि कलकत्याला । सेनगुप्त सुभाष बाबूला ॥
मुंबईच्या नरीमन वकिलाला । तसे वीरबंधु सावरकरला ॥
सोडल नाही लाहोर रत्नागिरिला । गुजराथ मद्रासच्या पुढाऱ्याला ॥
जोशि जो नेहर रत्नागिरिला । त्याचा पोऱ्या सत्याग्रही बनला ॥
बऱ्हाडच्या भोंवति वणवा पेटला । झोप कसी लागलि बऱ्हाडाला ॥

टीप:—धडाधडिच्या यादिमंदि काही । बऱ्हाड आला नाही ॥ बर्फीवाणि कसा बऱ्हाड थिजला । याच ठे दुःख भारताला ॥ ३ ॥ सत्याग्रह० ॥ ध्रुपद ॥

गर्जना ४ थी.

मता मतांची बनली जूट । हिंदुस्थानांत । जाती भेदाच खूळ मेल । परी बऱ्हाडात अजुन उरल ॥ जाति जातित तंटे लढवून । आपण साव बनुन । आजवरि सरकार हे जगल । एकि जरि टिकेल काढिल पक्ष ॥ पळुण जाणे हि मुश्किल होईल । कृति केली कुटिल । कृत्याचा

जाव जरी पुसला । उत्तरें नाहि सुचणार याला । जणु प्राण देशाचा हाय । लाला लजपतराय । क्रूर लाठिला बळी पडला । त्यान कोणता गुन्हा होता केला । मिरवणुक कारे अडविली ? । लाठी मारिली । राष्ट्रपति जवाहिरलालाला । सुळि कसे दिले माणुस्किला । योग्यता राजा होण्याची । शूर पंडिताची । त्याच्यावर हल्ला करतो पाही । बारा रुपडयाचा शिपाई । सुभास बाबु आणि सेनगुप्त । टाकले तुरुंगांत । तेथें त्यांच्या वर्ती हल्ला केला । अमानुषपणें मारल त्याला । मार खाऊनशान बेशुद्ध । पडले तुरुंगांत । सिह त्वा कोंडुनशान पिंजऱ्यांत । मारल त्याला कोणता केला पुरुषार्थ । मदत केली लढाईत तुला । बक्षिस काय त्याला । तेव्हा मॉरशाल लॉ पुकारून । ठार केल गोळ्या घालुन ॥ नरपशू डायरसाहेबान । नोकरशाहीन । अमानुषपण कापल प्रजेला । काय गुन्हा त्यांचा होता झाला ॥ किति सांगु त्याच्या कृत्यास । कुटिल इतिहास । बंधुनो ऐकून जरी घ्याल । सैतानहि लाजुन जाईल ॥ शेकडोगणति माणुस त्वा धर्ले । सांग रे सकळ । धर्ले त्याना कोणत्या कारणान । काय यानी कायदा मोडला म्हणुन ? ॥ कायदा कोणी नाहि मोडला ? । सांग तू मला । सोडून तुझे बगल बच्चे जाण । कायदा तोडला संमद्या भारतान ॥ शक्ति असेल तुझ्या कायद्यांत । जरि अंगांत । पकड आज समद्या भारताला । तेव्हां आम्ही मर्द समजु तुजला ॥ नुस्ता मिठाचा कायदा मोडून । स्वस्थ चित्तान । बसाल तरी कांही नाहि केल । राष्ट्राला धुळीस मिळवाल ॥ यापासून आपला शत्रु कांही । जोरिस येणार नाहीं । चिमटा नाहि बसलार पोटाला । चटका बसला लागल बोंब्लायला ॥ त्याचा जरी व्यापार बुडवाल । उपाशि माराल । येईल बठणिला देईल ताला । दोन्हि तोंडाचे नाक दाबा ॥ नाक एक अन्यायी कर । दुसरे व्यापार । मारा टोला दोन्ही तोंडावर । मग्रिती

आपणा अजंगर ॥ विलायती वस्तु साऱ्या झाडून । हकला येथून। गोऱ्या-
ला र विका तुम्हि दमडीला । शरण येईल तुमच्या चरणाला ॥ वऱ्हा-
डातील कांहीं व्यापाऱ्यांना । हाव सोडवेना । ठाव नाहि काय चालय-
भोंती । कशाला कायदेभंग म्हणती ॥ व्यापाऱ्यांच तत्व आहे एक ।
घेऊन माल ठोक । कसातरी फायदा मिळवावा । चोनिने प्रपंच चाल-
वावा ॥ जसा नफा विलायति मालात । होत व्यापारात । तसा देशि
मालात नफा असता । विलायती साठिच को मरता ॥ मस्त माल
धन्याचा खाऊन । त्यालाच खाडि टाकून । नेल वाहून पाठीवर
चोराला । ओझ सारखेच गाढवाला ॥

चाल:—व्यापारी लोक देशोदेशीचे । ऐकुनि पंडित मालवीचे ॥
जमुन त्यानी ठरविले साचे । घेणार नाहि कापड विलायतीचे ॥
देव जाणे येथील व्यापाऱ्यांचे । काळिज काय काळ्या फत्तराचे ॥
कैसे निगरगट्ट बनला साचे । भरता घर उलटे चोराचे ॥

टीप:—अजुन तरी सभा भरवून । ठराव पास करुन । बंद करा
विलायती मालाला । जोड हिच कायदे भंगाला ॥४॥ सत्याग्रह०।धृ०।

गर्जना ५ वी.

सामुदाइक कायदेभंग झाला । शहर अकोल्याला। सभापति ब्रिजलाल
बियाणी । कायदा तोडला सर्व वऱ्हाडानी । कायदेभंगास असंख्य पुढे
आले । वर्कीन्ट मागे गेले । जसा कांहि लांडगा लागला माग ।
किंवा काय घरास लागली आग ॥ तिकडे देशात भडकली आग ।
इकडे किर्तिस डाग । लावला कांहि खुशाल चेडुन । नाव बुडविल
व्यापाऱ्यान । परदेशी जरि माल ठेवला । त्यांनी दुकानाला ।
तरी आपण लावू नये हात । सडेल माल घमेल वोंझत ।
सरकारी नोकर ऑफिसर । पोलिसावर । कॉंग्रेस म्हणे टाका बहिष्कार ।

बंद करा पुंगी पेटारा । त्यांना धान्य पाणि देवु नका । तंबाखू हुक्का । हुक्का बनल त्यांच्यार तोडाचा । उपाय हा डोकु मारण्याचा ॥ नोकरशाहि डाकू पातला । रात्रि बाराला । गांधिच्या आश्रमांत घुसला । शांतिचा मुगुटमणि नेला । मे महिना एकोणविशेतीस । पांचे तारखेस । पूज्य महात्मा गांधी धरला । त्याला वेमुदत अटकुन ठेवला । अस्लाच कायदा पहा रावणाचा । होता त्या काळचा । सिता वेमुदत अटकेत होती । तैशी सध्याची राज नीती । शरम वाटली दिवसा येण्याला । तोंड दाखवण्याला । बुवड नच तोंड दावि सूर्यास । भीत होते राक्षसही रामास । बापुजी गांधि धरण्यास । केला अट्टाहास । संमदे यान कायदे पाळथे घातले । परि कलम एक ही नच दिसले । जेव्हां त्याच्या कायद्यान याला । थारा नाहि दिला । तेव्हां बाप जाद्यास हाक मारली । शंभर वर्षा मागिल कलम काढली । तेव्हां गोरे पुरे स्थिर इथे । होते का नव्हते । १८२७ सालाची । २५ वी कलम लावलि साची । गांधिला पकडिले जरी । चळवळ ही तरी । कदापी बंद नाहि होणार । स्वराज्या-वीण नाहि जगणार ॥

चाल:—मिठाचा कायदा मोडियेला । अजुन ते कार्यभाग उरला ॥
बंदि आधि करा तुम्हि दाखला । धडाक्यान विलायती मालाला ॥
जो जो अन्यायि कर बसला । भरु नका तुम्हि सरकारला ॥
मिळवा हो मिळवा स्वराज्याला । राष्ट्राच्या राखा अब्रूला ॥

टीप:—प्रार्थि गोपाळकृष्ण शाहिर । जोडोनी कर । ईशाचे अधिष्ठान ज्याला । मिळे यश, कीर्ती, सौख्य त्याला ॥ ६ ॥

॥ पहिला भाग समाप्त ॥

—वंदेमातरम्—

NATIONAL ARCHIVES OF INDIA

॥ श्री ॥

रणगर्जना भाग २ रा.

गर्जना १ ली.

ॐकार मूळ स्वरुपात । दिसासि जगतात । गजानन रिद्धिसिद्धि दाता । निवारक अघ भवभय त्राता ॥ वंदितो काव्यदेवता । विधीची सुता । विण्यातुन सांगे वेदमंत्र । नसे हा आत्मा परतंत्र ॥ वंदितो सद्गुरुपदा । वारि आपदा । दावि चिद्रूप ब्रह्मकाया । निवारी त्रिविध ताप माया ॥ श्रीविष्णु सृष्टि पाळितो । त्यासि प्रार्थितो । पाळि नच पंढ म्याड लोका । पाळि त्वद्भक्त मर्द जो का ॥ स्वातंत्र्य देते पाव । संकटि धाव । अजुन किति अंत बघसि आई । टाहो का फोडी आला नाही ॥ वंदितो शिशुचे दैवत । तात मम मात । बाळ हा शरण तुमच्या पाया । कृपेनी करा पुनित काया ॥ घनदाट सभा पाहुन । करितो वंदन । बुद्धिमान बंधु भगीनीला । शिशूच्या ऐका कवनाला । स्मरुनिया देशसेवेला । पोवाडा हा केला । काहिशा मऱ्हाटि भाषेत । कळवा सकलासी हेत ॥ नाहिं ज्ञान मला भाषेचे । मूज्ञ तुम्हि साचे । चुका मज क्षमा करा दोष । मूढ मी करी प्रार्थनेस ॥ प्रियबंधु अहो रिपोर्टर । भाषा पेंटर । ऐका तुम्हि उघडयार कानान । रिपोर्ट लिहुन आवा ईमानान ॥ धरा लाज कांहिं थोडि फार । अहो रिपोर्टर । वीत-मर खळगिसाठि मरता । बंधुचे कंठ किती चिरता ॥ अहो पोट भरीते श्वान । तुकडे चघळुन । शेणामंदि बांधुनशान वाडे । जगले आहेत कितिक नर्ककिडे ॥ पैसा मुक्तिस नाहि नेणार । केव्हा कळ-णार । देशापाड थोर हिरे गेले । जेव्हाला मंदिर मानियेले ॥ रिपोर्टर न्हा हो सावध । सोडा हा वध । माग राहु नका र पंढा वाणी ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

उजेडात यारे मर्द वनुनी ॥ सत्याग्रह रण भडकलें । वीर धडकले । अन्याई र सत्ता झोडण्याला । चला तुम्हि कायदे मोडण्याला ॥ ध्रुवपद ॥ अठ्ठा पगड जातिचे लोक । संमदे एकुण एक । सत्याग्रह करण्यासाठि जमले । जहाल आणि मवाळ एक झाले ॥ देशाचे उग्ररुप पाहि । सुचेना कांहीं । म्हणुन त्यान नविन कायदा केला । ऑर्डिनंन्स नाव देति त्याला । एके जागीं बुकें कायद्याची । केली महिवर्चि । दुसरा सात पुडाच होईलकी तो । आणिक कायदे कशासाठि करतो ॥ जरि जाळू म्हणाले गोऱ्याला । लाकडे नको त्याला । लंडन जीव्हून कायदे उरतील । राहिले नोकर शाहिस पुरतील ॥ इतके कायदे असुन भाराभर । आणिक घाली भर । ऑर्डिनन्स कायदा नवा केला । यान अग्या बेताळ जागविला ॥ अग्याबेताळ मारावा म्हणून । पंथ काढला शोधून । कॉंग्रेसनी त्याला गाडण्याचा । मंत्र मालं कायदे मोडण्याचा ॥ कारण कायदा म्हणजे ज्याचि शक्ति । कायदा हिच युक्ती । कायदाच ज्याचे शस्त्र शिरस्त्राण । कायदा मोडता जातिल त्याचे प्राण ॥ हे वर्म जाणुन कॉंग्रेस । सांगे सर्वांस । नको देकूण मारण्यास तलवार । शस्त्र धरा फक्त बहिष्कार ॥ पोहोणाराचे मरण पाण्यांत । वीर समरांत । व्यापारांत मरण व्यापाऱ्याचे । तुमच्या खिशात प्राण इंग्रजाचे ॥ तुमची चळवळ भडकलि म्हणुन । गेला हा चिडुन । नविन यान कायदे जारि केले । जुल्मि ऑर्डिनन्स लावियेले ॥ गोऱ्याचे क्रूर कृत्यास । दाविति जगतास । वर्तमान पत्रें सलती याला । प्रेस ऍक्ट मुडदा उकरीला ॥ परि माहित नाहि मूर्खास । दावता पापास । जावुन तें बांधले आढ्यावरती । सूर्य कुणि झाकला काय हाती ॥ व्हॉईसरायचि गेलि अक्कल । काढली शक्कल । अकलेची तार लांब झाली । कॉंग्रेस बेकायदशीर केली ॥ कॉंग्रेसचे कार्य धुरंधर । पुढारी थोर थोर । बंद जे जगांत झालेले । सर्व आज उडाणटप्पु ठरले ॥ कॉंग्रेस संस्था म्हणजे आहे

कोण । विचार जावून । तुझ्या मार्गाल पूर्वजाला । धूप दावुन त्यांच्या थडग्याला । ते सांगतिल पूर्व इतिहास । स्थापुन काँग्रेस । चाळिसा वर्ति वर्षे झाली । कायदेशीर चळवळ करित आली ॥ राष्ट्राचा प्राण काँग्रेस । वंद्य जनतेस । आज्ञा काँग्रेसचि झाली म्हणुन । संमदा हिंदुस्थान देतो प्राण ॥ प्रजेवर्ति केला अत्याचार । अमानुष फार । वंदनिय पुरुष जेलांत नेले । म्हणति बेगुन्हा फाशी दिधले ॥ मुडदे हि शांति सोडुन । उठतिल भडकून । इतका त्वा अत्याचार केला । परि जन अजुन शांत बसला ॥ काय तुझ्या भिवुन लाठिला । गोळिवाराला । मारत हो शांति नाहि बसला । काँग्रेस नियमानि बद्ध झाला ॥ धर्माज्ञा नव्हत्ति बांधवास । म्हणुन तेरावर्ष । सर्व जण शांति धरून बसले । अवघ्या अठ्ठा दिवसांत कौरव चिरिले ॥ निःशस्त्र प्रतिकारास । सांगे काँग्रेस । शांति तुम्ही धरून कायदे मोडा । अनत्याचारे शत्रु झोडा ॥ म्हणुन जुल्म सहन करतात । शांति धरतात । धुंदि नको ठेवुं डोळ्यावरती । होईल तुझि तीन चिमट्या मारी ॥ काँग्रेस निर्व्हाण आहे खास । डवचु नको तीस । काँग्रेस म्हणजे नाहि पोरखेळ । समज ती असे तुझा काळ । काँग्रेस होति ती म्हणुन । उर्मा तु अजुन । वाटत काय जगाव जमि तुजला । शरण जा काँग्रेस डॉक्टरला ॥

चाल:—रोग कोणता आहे इंग्रजाला।नपासण्यास काँग्रेस वैद्य आला॥ म्हणे कायद्याचे अजिर्णाला । कायदेभंग चूर्ण द्यावे याला ॥ परी रोगि बरा नाहि दिसला । म्हणुन पुन्हा नाडि धरून बसला ॥ म्हणे वैद्य भूत जडले याला । अता तुम्हि बोलवा मांत्रिकाला ॥ जहाळ आणि मवाळ मांत्रिक जमला । त्यानि बहिष्कार मंत्र मारला ॥

टीप:—बहिष्कार मंत्र जोरदार । बसता सुतावर । भूत संचार अंगि झाला । तेव्हां सैतान नाचु लागला ॥ १ ॥

सन्याग्रहरण:—॥ धृवपद ॥

गर्जना २ री.

मुसलमान कितिक केले ठार करून गोळीवार । पेशवरामंदि कहर केला । मस्तिमंदि चढला टोपीवाला ॥ सैतान थैं थैं नाचला । जेव्हा सोलापुरला । वर्णाया तेथील वृत्त सगळे । थोर थोर लेखक । शिणुन गेले ॥ पिकेटिंगचि कॉंग्रेस ऑडर । म्हणुन व्हॉलेटियर । गेले दारुच्या भट्टिपाशी । वादावादी झाली मालकाशी ॥ गुत्यावर्ति झालि मारामारी । गोष्ट ही खरी । परी अस्ले लोक न कॉंग्रेसचे । बगल वचे अरितल सरकाराचे ॥ भट्टिवर्ती आले पोलीस । दिमाख दावायास मस्तिनें लाठी चालु केली । मंडळी जखिम होऊन पडली ॥ नोकरशाही मार्ते अन्यायान । पाहुन गुंडान । अनावर क्रोध त्यांचा झाला । मार्ले गुंडानी पोलिसाला ॥ हे गुंड कोणि उठविले । कोण कोठिले । चोरांचा तपास नाहि लावेला । संन्याशि धरून फाशि दिधला ॥ बोलावुल लष्कर आर्जंट । क्रूर सार्जंट । बंदुका सज्ज ज्यांच्या असती । सोलापुर दिले त्यांचे हाती ॥ आधीच माकडाची जात । धुंद मद्यात । डसुला विंचु झाली भूतबाधा । चेष्टा त्याच्या किती सांगु दादा ॥ बुरुज्यांचि घेवुन मोटार । गोरे झाले स्वार । बंदुका रायफल घेवुन हाती बुरुज्यांच्या आडुन गोळ्या झाडली ॥ शहरामधुन सोडली मोटार । करित गोळिबार । सट्सटा सूं सूं गोळ्या सुटती । पट्पटा जखिम लोक पडती ॥ जसा पाऊस पडे सर्वांवर । तसा गोळिबार । सरसहा स्त्रिया मुला वरती । नव्हती सार्जंटाचि भेद धृत्ती ॥ तीन तास गोळी अखंडित । झडली शहरांत । बेगुमानपणें सुटती गोळ्या । दीनजन फोडिती आरोळ्या ॥ बंदुकिचे आवाज ऐकून । पहाण्यासी म्हणुन । शाळेतिल सज्जात मुलें जमलि । पोर बुद्धिनें बघु लागली ॥ संमदी अज्ञ बालके अहा । एकूण एक पहा । पोलिसास नव्हते काय डोळे । जखिम केलि कितिक मुलें बाळे ॥ एक

पोर दहा वर्षाचे । रानडे मास्तरचे । बसता गोळि त्याच डोक फुटल । तिसऱ्या मजल्यावरून बाळ पडल ॥ ते झाले रक्त बंबाळ । कोवळे बाळ । प्राण तात्काळ सोडला त्यान । त्याचि माय रडे कळवळ्यान ॥ क्रोधान बोले शापास । अपटुन हातास । मेल्याच ग निसंतान होवो । गोऱ्याच राज्य जळून जावो ॥ पुत्र शोक तिला आवरेना । आलि मुर्च्छना । बापहि सुन्न होवुन गेला । दुःखान जणु वेडा बनला ॥ कोणत्या कायद्यात अस्ली ही कृती । लिहिली आहे ती । सांगरे कायदे तपासून । तुझ्या बाप जाद्यापासून ॥ कायद्याचा दिमाख मिरविसी । कृती राक्षसी । मूर्ख अरे राहिली नाहि जनता । वेळेवर मागेल जाब पुरता ॥ आणिक कायदा लष्करी । लावला सोलापुरीं । गांधीची टोपी शत्रु बनली । काँग्रेस झेंड्यास बंदि केली ॥ झेंड्याचा असा अपमान । होईल काय सहन । काँग्रेस म्हणे जुल्मि कायदे तोडा ॥ सत्याग्रह करून लावा झेंडा ॥ काँग्रेसचि होता ऑडर । सत्याग्रहिवीर । झेंडा घेऊन सोलापुरीजाती । फरपणे साजंट त्यास छळिती ॥ स्टेशनावर्ति येता झेंडा घेवुन । साजंट येति धावुन । तुटुन पडतिवारा तिघावर । झेंडा हिसकून थुंकती तोंडावर ॥

चाल:—सिगारेट जळति घेऊन हातीं । ढुंगणावर साजंट चटके देती ॥
बरगड्यात दस्ते मारुन पाडती । गुह्येंद्रियावर्ति लाठ्या मारीं ॥
मार खावुनसान बेशुद्ध पडती । परी कांहीं झेंडा न सोडिती ॥
प्राणांतिक हालसोसुन अंती । झेंडा लावला सोलापुरावर्ती ॥

ठाण:— अन्यायि राजसत्ते ऐक पाहिजे का सौख्य । परी त्या मार्ग भलता घरला । मिळणार हा तुझ्याच पदरात्या ॥२॥ सत्याग्रह ।धृ०

गर्जना ३ री.

किति काढु गोऱ्याचे चित्र।पुणार नाहि गत्र।जस यानें कळल सोलापुर्ती । तसा कितिक जागि कहर केला ॥ आज वंऱ्हाडाचे भोवती ।

अस्ता आशि स्थिती । झोप कशी लागली वऱ्हाडाला । याच लै लांछन मारलाला । चळवळीस यश नये जरी । सुस्तीने तरी समजा मुष्कील जगणें पुढती । डवचुनि कुणि साप न सोडीती ॥ नस्ता हिंमत आपल्या आंगि साचि । साप वधण्याची । त्यास छेडु नये जाऊं घावा । डवचल्यास जिवेचि मारावा ॥ हे वर्म घ्यारे चित्तास । सूज्ञ तुम्हीं खास । डवचिला तुम्हीं गोरा सर्प । सुस्ति सोडुन जिर्वा त्याचा दर्प ॥ होवु नये लोक जागृती । गोरा मनि चिंती । जंगल सत्याग्रह नच व्हावा । ह्मणे पुढाऱ्यास पकडुन ठेवा ॥ हुकुम सुटता घेवुन वारंटास । २९ तारखेस । धरला अभ्यंकर बॅरिस्टर । १२४ कलमेवर ॥ मे १९३० । ३० तारखेस । वामनराव जोशी वीर धरला । लावुन १२४ कलमेला ॥ नेता नाहि उर्ला वऱ्हाडास । धर्ले पुढाऱ्यास । म्हणुन बापुजी अणे आले । वऱ्हाडचे युद्ध मंत्री झाले ॥ वयोवृद्ध ज्ञान वृद्धही । तपोवृद्धही । बापुजी अणे लोकमान्य । पुढारी दुजा नसे अन्य ॥ मूळ कायदे कर्ते जे खास । असेंबली कौन्सीलांत । अस्ला अधिकार बापुजीस । सोडुन आले कायदेभंगास ॥ बापुजीनी हुकूम जारि केला । ऐसा जनतेला । सरकारी गवत कापा सर्व । कायदे मोडुन जिर्वा शत्रु गर्व ॥ जंगलि कायदा खास जंगलाचा ॥ वैरी गाईचा । देश जान शक्तिहीन बनला । ठेवणार नाही आम्ही कायदा अस्ला ॥ मीठ आणि पृथ्वीवर गवत । नैसर्गिक होत । ईश निर्मित वस्तु असतीं । सर्व जीव त्याचमुळें जगती ॥ मीठ आणि गवत निर्माण । केलर देवान । नाहि याच्या वान पेम्हन लावल । घेता गवत काय राज्य बुडल ॥ गवतवाचुन गाई जनावर । मरतिल भराभर । म्हणुन गवत निर्मिदेवराय । गवत खावुन अमृत देते गाय ॥ जन्म दात्रि आई प्रत्यक्ष । देईना लक्ष । तीन दिन पाजिन नाहि माय । त्या क्षणी सर्वांस जगवी गाय ॥ जन्मता-क्षणी दुध दिले । म्हणुन वाढले । आईच्या परिस मोठिगाय । तिला उपाशि ठेवता हाय ।

याचे मागिल राजांची रीत । प्रत्येक गावांत । ठेवित होते मोठे गायरान । ज्यामध्यें गवत होय पुर्ण ॥ आताहि अस्ती गायरानें । ठेवले गोऱ्यानें । वंगाळ लै खड्काळ जमिन पाही । ज्यात मातिचा गंध नाहीं ॥ एवढि अक्कल नाहि गोऱ्यास । वंगाळ जमिनीस । उगवेल काय गवत खडकावर्ती । गोरा दिड्शहाणा मोर्ती मुर्ति ॥ जंगल आहे आपल्या मालकीचे । नाहि याच्या वाचे । देवु नका चराई गोऱ्याला । कापा गवत जगवार ठोराला बापुजी अणे यापरी । तत्व खरोखरी । सांगती फिरून प्रांतभर । नाहिं विश्रांति क्षणभर ॥ मी कायदेभंग करणार । हक्क स्थापणार । जंगलाचा सत्याग्रह करून । यावे तुम्हीं माझ्या मार्गावरून ॥ स्वातंत्र प्राप्ति पित्यर्थ । निघे लढण्यार्थ । रणस्तंभ रोईला र पुसदान । आहे यवतमाळच्या जिल्हात ॥ १० तारीख आलि जुलईस । १९३० स । युद्ध करण्यास सिद्ध झाला । जुल्मि सत्तेस पेंच पडला ॥ हाति घेवुन कोयता परशुस । निघाले जंगलास । बापुजी अणे घेवुन सैन । समाज तेथिल मोजा हजारान ॥ रिपु सैन्याची धांदल । कोण वर्णिल । मॅजिस्ट्रेट, डीसी, सिटी, सारे । धावति जणु अंगि भर्ले वारे ॥ जणु समुद्र फैलावला । तसा जन जमला । सरकारी जंगलात अणे शिरले । फॉरेस्ट अधिकारी अडवुन बोले ॥ सरकारि जंगल तोडनेकू । हुकूम नहि तुमकू । घास काट्नेका पास लेना । उस्के बिगर नहि अंदर जाना ॥ मै जानता नहि रे पास । काटुंगा घास । जंगल नहि तेरा न चोट्टोंका । मालिक हम और खुदा ईस्का ॥ ऑफिसरास उत्तर देवुन । निघाले तेथुन । कापा गवत अणे हुकूम करिती । सरसरा सैनिक गवत चिरती ॥ गवत आले घेवुन बाहेर । धावले ऑफिसर । ३७९ कलम लावुन । बापुजी अणे धरून ॥ जे कलम लावती चोरास । तेच बापुजीस । सत्तेचिर मस्ति चढली याला । घटकाभर ह्मणतो मालक तुजला ॥

NATIONAL ARCHIVES OF INDIA

ज्याचा माल तोच न्यायाधीश । होत नाहि खास । आर तूं अक्कल विकली कोणा । म्हणवितो लै शहाणा आपणा ॥ न्याय कर्ता दुसऱ्या देशातून । आण फ्रान्सातून । जर्मनकडुन करवी न्याय जोका । किंवा कलम चुकेल सांग लोका ॥ ज्यांना अक्कल नाहि कलमांचि । तुझ्या कायद्याची । नेमलि काय र अस्लि मेंढ कोर्टास । न्याय ना ओळखिती धर्मास ॥ कायदा म्हणजे लहर सरकार्चि । लहर ऑफिसर्चि । ठराविक अर्थ नाहीं उरला । लहरा लै दुतोंडया सर्पाला ॥ कूणी जरी कायदा मोडिला । शिक्षा द्यावि त्याला । जारित मधे जारत सहा महिने । किंवा कांहीं दंड द्यावा त्यानें ॥ बोंब ठोकली कायद्यात । राहिलि नाहि रीत । फटक्याचि हि शिक्षा सुरु केली । वर्ष दोवर्ष कूणा झाली ॥ महा चोर खुनी डाकूखोर । असेल खरोखर । त्यास फटक्याचि शिक्षा देती । सत्याग्रहिं काय अस्ले असती ॥ सत्याग्रहि अस्ती थोर थोर । कितिक बँकर । जज्जासारखे नोकर अस्तील ज्यांचे । नशीबात फटके यावे त्यांचे॥ अस्ला भेद कायद्यामदि कांहि । कोटे र लिवला नाहीं । भेद करि वेअक्कल जज्ज । बंधु चिरण्यास झाला सज्ज ॥ न्यायासनी न्यायाचा खून । पाडला त्वा करुन । लागला कसा गोंडा र घोळायला । इंग्लंडमधि काय जन्मास आला । चैनिला विकले शील । कोठे फेडशील । पाप हे हिंदसुता वारे । श्राद्ध तुझ नाहीं करणार गोरे ॥ देशभक्त आणि नोकरशाही । ह्यांच्यात भेद नाहीं । दोघेहि पुत्र भारताचे । भेद हे फक्त भावनेचे ॥ एक तो देशरक्षक, एक भक्षक, एक भूसाठि प्राण देयीं । एक बंधुचे प्राण घेई । जंगलातील गवत घेता कुणी । बावरे कुत्र्यावाणी । तुरुंगामदि माणुस दडपिल । घेता गवत काय राज्य बुडल॥

चाल:—पकडल अणे बापुजीला । सहसंबुद्धे वीर धरुन नेला ॥

वियाणी युद्ध मंत्रि धरिला । पकडले गोळे वकीलाला ॥

वामणगांवकर वीर धरिला । श्रीरामशेठ धरून नेला ॥
भोजराज डॉक्टर पटवर्धनला । पारसनिस डॉक्टर सोमणाला ॥
शेकडो गणती यान माणुस धरला । किती तरी सांगु मि यादीला ॥
टीप:—अधिकारि होवुन उन्मत्त । छळिती देशभक्त । धरुनिया
मूड भावनेला । दावूं म्हणतात चळवळीला ॥ ३ ॥

गर्जना ४ थी.

खानदेशी महाराष्ट्रांत । वऱ्हाड प्रांतात । जंगल सत्याग्रह सुरू होत ।
मिळाला सर्व वर्ग त्यांत ॥ परि एक वर्ग निभ्रांत । दडला वंगल्यात ।
जसे वटवाघुळ घुबड दडती । स्वार्थ साधु दारामाग लपती ॥ चळवळीत
असंख्य सामिल झाले । वकील मागे सर्वे । जसा कांहिं
लांडगा लागला माग । किंवा यांच्या घरास लागली आग ॥
तिकडे देशांत भडकली आग । इकडे किर्तीस डाग । लावला या रे
खुशाल चेंडून । नांव बुडविलें वकिलान ॥ जेलात गेले बंधु शेकडो
गणती । हाल सोशिती । काय सुख त्यांना नको झाले । किंवा पोटासाठीं
जेलात गेले ॥ ॲडव्होकेट कितीक बॅंकर । गेले बॅरिस्टर । जेलात
आहेत थोर कार्यकर्ते । काय यांच्या घरी अन्न नव्हते ॥ प्रपंचाचि राख
रांगोळी । सुखाचि होळि । त्यांनि केली राष्ट्रहितापायीं । काय हे
त्यानि येत नाहीं ॥ हे सर्व कळते निभ्रांत । मूर्ख नाहींत । कायदे
पंडित बुद्धिवान । देश प्रेमाचि फक्त बाण ॥ जाळावीण येईना कड ।
मायेवीण रड । येईना भ्याड रणामाजी । कांहीं वकील बनले दोहि
आजि ॥ हिंमत नसल्या कायदेभंगाचि । तुम्हा जरि साची । चळवळिस
मदत करूं शकता । यथाशक्ति तन, मन या वित्ता ॥ शेकडा पांच
प्रमाणें वकिल । जरि मिळतील । कार्य करितील इमानान । तरि सुट-
तिल भूमि ऋणातून ॥ सरू नका आज दुरदुर । वकील

बॉरिस्टर । बोलु मी काय अल्पबुद्धि । कराल काय तुम्हीं आत्म शुद्धी ॥ राज्यकर्ते आहे गव्हर्मेंट । मुख्य पार्लमेंट । ५००० मैल दूर बसले । परि अपलेच वेधु त्याला फितले ॥ न्याय निती, धर्म, ज्या नसे । फक्त धन दिसे ॥ वृत्ती असे नीच अस्ली ज्यांची भूमिला । ओझि झालि त्यांची ॥ छू म्हणता क्षणि धावती । बंधुस चावती । उत्तरे देति मस्ति मंदी । तगाई देईल तुम्हां गांधी ॥ कॉंग्रेस म्हणे सांगावे उलट । बोलुनी स्पष्ट । इंग्लंड मधुन आण फाक दाणे । नाहि तुझ्या बाचे लागत देणें ॥ दौऱ्यावर्ति फिति तहसिलदार । नाहि उपकार । फिरण्याचा भत्ता मिळतो यांना । तुम्हि फुकट खुराक देता त्यांना ॥ सरकारि नौकर ऑफिसर । पोलिसावर । कॉंग्रेस ह्मणे टाका बहिष्कारा । बंद करा पुंगि पेटारा ॥ येता गावांत सरकारि नौकर । रहाण्यास मागेल घर । म्हणाव त्याला उतर चावडीवर । पाणि आण स्वःताहा चावडीवर ॥ मागेल जरी खाण्यास सामान । सांगा निक्षून । तुम्हांस नाही मिळणें मिरची मिठ । इंग्लंडहून मागवा डाळ पीठ ॥ दुध मागेल गवळ्याशी जरी । सांगावे तरी । दुधाचे र डबे इंग्लंडात । बोलावुन ओति र नरडयात ॥ कपडा घेवुन येता शिवण्यास । सांगा फितुऱ्यास । शिवणार नाहि तुझे कोट पँट । चालता हो बापर गोणपाट ॥ गावातील न्हावी धोब्यांनी । मोल मजुरांनी । करूं नये त्यांचि कामे सोडा । चांभारानि शिवूं नये जोडा ॥ त्यांच्याशि सोइरिक करूं नका । संबंध तोडुन फेका । पापि देह देशद्रोह्यांचा।म्हणुन मुडदा नेवुं नका त्यांचा ॥ असा टाकता कडक बहिष्कार । नोकरशाहिवर । तेव्हां तिचि मस्ति संमदि जिरल । नाक मुठित धरून शरण येईल ॥ करून प्रजा संमदी भीकारी । चैन हा करी । तुमच्या पैशावर्ती माजला हत्ती ।

NATIONAL ARCHIVES OF INDIA

व्यापार रोखुन जिर्वा त्याचि मस्ती ॥ भरू नका टॅक्स ईन्कम् । आणा नाकात दम । माकडाला चारू नका मेवा । शेतिचा वायदा रोखुन ठेवा॥ नुस्ता जंगलाचा कायदा तोडून । स्वस्थ चित्तान बसाल । तरि कांहीं नाहि केल । राष्ट्राला धुळिस मिळवाल ॥ स्वस्थ बसून आपला शत्रु कांहीं । जेरिस येणार नाहीं । चिमटा नाहि बसला र पोटाला । बस्ता चिमटा लागल बोंब्लाया ॥ त्याचा जरी व्यापार बुडवाल । उपाशी माराल । येईल वटणिला देइल तावा । दोन्हि तोंडाचे नाक दावा ॥ एक नाक अन्यायि कर । दुसरा व्यापार । मारा टोला दोन्हि तोंडावर। भक्षितो अपणा अजगर ॥ तुम्हि टॅक्स देणे बंद करा । होईल घाबरा । वर्म हे मुख्य यांत सगळे । मोऱ्याचे होतिल पांढरे डोळे ॥ सौख्य येईल चालुनशान घरा । प्रतिज्ञा करा । घालिन मी बहिष्कार पुर्ण । करिन त्याच्या व्यापाराचे चूर्ण ॥ पुढाऱ्यांचि चाड कांहि धरा । देश उद्धरा । यांत काय कठिण वाटते साचे । काय तुम्हि पुतळे र दगडाचे ॥

चाल:—टॅक्स भरू नका सरकाराला । बेधडकपणें तोडा जंगला ॥
दारू पाई देश कार झाला । विलायती वस्तु सोडा सगळ्या ॥
नोकरावर बहिष्कार घाला । यशस्वी करा चळवळीला ॥
मिळवा स्वातंत्र भारताला । राष्ट्राच्या राखा र अब्रुला ॥

टीप:—प्रार्थि गोपाळकृष्ण शाहिर । जोडुनि कर । पोवाडा नाहि करमणुकीला । बंधुनों करा कांहि कृतीला ॥ ४ ॥

—वन्दे मातरम्—

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण:—

शाहीर गोपाळकृष्ण चोळकर, आकोला [वऱ्हाड].

मुद्रक:- कृष्णाजी नारायण सांपळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
२२४, बी. गिरगांव बॅकरोड मुंबई.

NATIONAL ARCHIVES OF INDIA